# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-११२** **दिनांक - २५/०३/२०२४**

## अनैतिक मानवी वाहतुक प्रति. कक्ष नालासोपारा यांचेकडुन एक महीला वेश्या दलाल हिस अटक करुन दोन पिडीत महिला यांची सुटका

नायगाव पोलीस ठाण्याचे हद्दीत मुंबई - अहमदाबाद हायवे रोड ससुपाडा येथील किनारा ढाब्याजवळ एक महिला वेश्या दलाल वेश्या गमननाकरीता मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती मिळाल्या वरुन पोलीस निरीक्षक सौरभी पवार यांनी सदरची माहिती सहा.पोलीस आयुक्त यांना दिली. त्यानुसार पोनि सौरभी पवार, पोहवा/९५०३३ बापु पवार, पोहवा/०५०२८ रोशन नारायण किणी, पोहवा/०७०५५ महेंद्र पुंडलीक शेटये, मपोहवा/०५००४ साक्षी संकेत डोईफोडे, मपोशि/१६१११ पुनम मधुकर जगदाळे, चालक पोहवा/०७०६६ सुनिल विष्णु पागी, सर्व नेम. अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा तसेच बोगस गिहाईक व दोन पंचासह जावुन छापा टाकुन दोन पिडीत महिला यांची सुटका करुन एक महिला वेश्या दलाल आरोपी नामे **सुरेखा अजय बोराडे वय २८ वर्षे, रा. निलकमल चाळ मनाली व्हिलेज, जि.प.शाळेजवळ काशिमीरा, मिरारोड पुर्व मो.नं. ८६५७२०४४५७ मुळ रा. बिडकींग जिल्हा- औरंगाबाद** हिस पुढील तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि,यातील वेश्या दलाल **सुरेखा अजय बोराडे ही** पिडीत महीला १) वय- ३४ वर्षे व २) वय ३० वर्षे यांना पैशाचे आमिष दाखवुन त्याचेकडून वेगवेगळया ग्राहकांशी संपर्क करुन त्यांचेकडुन एका महीलेचे १०,०००/- प्रमाणे पैसे घेवुन पिडीत महीलांना वेश्याव्यवसाय करण्यास लावुन त्याचा मोबदला म्हणुन पिडीत महीलांना २०००/- रु.देत असते व ग्राहकाकडुन मिळणाऱ्या पैशातुन उर्वरीत रक्कम ती स्वतःचे कमीशन घेवुन तिचा उदरनिर्वाह करते. तरी सदर दोन पिडीत महिला यांची वेश्या व्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद दलाल महिला आरोपी हिस ताब्यात घेवुन तिचेविरुद्ध नायगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.१३८/२०२४ भादविस कलम ३७० सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप-आयुक्त सो (गुन्हे), श्री. अविनाश अंबुरे, मा. सहायक पोलीस आयुक्त सो (गुन्हे) श्री मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व स्टाफ यांनी केली आहे.

--------------ooooo--------------